प्रकरण : दुसरे

# राजर्षी शाहूंची राजकीय व शैक्षणिक विचारसरणी

# राजर्षी शाहूंची राजकीय व शैक्षणिक विचारसरणी

---

## शाहूकालीन संस्थानची परिस्थिती :

२ एप्रिल १८९४ च्या राज्यारोहण समारंभानंतर छत्रपती शाहू महाराज यांचा राज्यकारभार सुरू झाला. छत्रपती या नात्याने राज्यकारभार करत असताना महाराजांच्यासमोर अनेक अडचणी उभ्या होत्या. महाराज ब्रिटिशांचे मांडलिक होते. त्यामुळे त्यांना ब्रिटिशांनी आखून दिलेल्या राज्यसत्तेच्या मर्यादेत राहूनच राज्यकारभार करणे क्रमप्राप्त होते. तसेच १८२१ ते १८९४ या कालावधीतील अल्पवयीन छत्रपतींची कारकीर्द, अंतर्गत कलह, कृष्णकारस्थाने इत्यादी कारणास्तव कोल्हापूरची इभ्रत बरीच खालावलेली होती.

कोल्हापूरच्या प्रजेस साठसत्तर वर्षे स्वप्रभूच्या अमलाखाली राहण्याची फारशी संधी न मिळता, त्यांना दिवाणशाही, रिजंटशाही आणि कौन्सिलशाही यांच्या बेबंदशाहीत दिवस कंठावे लागत होते. १८२१ साली एका छत्रपतींचा (संभाजी तथा आबासाहेब) खून झाला. दुसरे (शहाजी तथा बुवासाहेब) यात्रेत मृत्यू पावले. तिसरे महाराज (बाबासाहेब महाराज) मुखत्यारी मिळाल्याबरोबर परलोकवासी झाले. चवथे (राजाराम महाराज) मुखत्यारी मिळण्यापूर्वी परदेशात कालवश झाले. पाचवे महाराज (चौथे शिवाजी) अत्यंत भयंकर मानसिक यातना सोसून अहमदनगरच्या किल्ल्यात मृत्यू पावले.[१]

१८४४ ते १८९४ या पन्नास वर्षाच्या काळात या गादीवरचे छत्रपती अल्पवयीन असल्यामुळे संस्थानचा कारभार त्यांच्यावतीने कारभारी, दिवाण किंवा

---

१. कीर धनंजय - प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती, श्री शाहू व्याख्यामाला, पुष्प पहिले, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, मार्च १९७० पृ. क्र १३

राजमंडळ (रिजन्सी कौन्सिल) चालवीत असे.[२] प्रत्यक्ष नियंत्रण करण्यास राज नसल्याने कित्येकांच्या चढेलपणाला व महत्त्वाकांक्षेला अतिशय जोर आलेला होता.

१८९४ च्या सुमारास कोल्हापूरच्या प्रशासनावरती ब्राम्हण , युरोपियन व पारशी यांचेच वर्चस्व प्रस्थापित झाले होते. उदा.'संस्थानचे एक्झ्युकेटिव इंजिनियर होते शॅनॉन, दरबार सर्जन होते सिक्लेअर, राजाराम कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते कॅन्डी, लेडी सुपरिटेंडेंट होत्या मिस लिटल, अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटलमध्ये स्टेट मिडवाईफ होत्या सारा साईक्स.अशाप्रकारे संस्थानचा प्रमुख जागावर ब्रिटिशांचे वर्चस्व होते. तसेच पारशी लोकांनी देखील संस्थानच्या प्रमुख जागा पटकावल्या होत्या. उदा. संस्थानचे दिवाण होते मेहरजीभाई कुंवरजी तारापुरवाला आणि पोलिस प्रमुख होते दोराबाजी पालनजी बाकी सर्व पदे ब्राम्हणांनी व्यापलेली होती.[३]

उदा.ज.ह.कीर्तने न्यायाधिश, बी.एन.जोशी मुख्य न्यायाधीश, दाजी पंडित सरसुभे (मुख्य महसूल अधिकारी), बाळाजीपंत गोखले सदर अमीन, वैध सरसुभे व इतर अधिकारी बावडेकर गोळवणकर, आळतेकर, थत्ते, भावे, गोडसे वगैरे वगैरे.[४]

१८९४ साली कोल्हापूर दरबारामध्ये ६0 ब्राम्हण अधिकारी आणि ११ ब्राम्हणेत्तर अधिकारी होते. महाराजांच्या खाजगीतल्या प्रशासनात ४६ ब्राम्हण आणि ७ ब्राम्हणेत्तर अधिकारी होते. कोल्हापूर संस्थानच्या एकूण ९ लाख लोकसंख्येपैकी ब्राम्हण आणि तत्सम उच्च जातीच्या लोकांची संख्या फक्त २६ हजार होती.तरीदेखील प्रशासनामधील अधिकतम पदे ब्राम्हणांनीच व्यापली होती.[५]

---

२. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २00७, पृ.क्र.५८४

३. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms Shivaji University, Kolhapur 1983, Page No.- 3- 4 (Introduction)

४. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.६८

५. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1983 Page No.- 4 (Introduction)

शिक्षणात ज्यांची मक्तेदारी होती त्या ब्राम्हणांनीच प्रशासनात आपले प्रभूत्व निर्माण केले होते. लोकसंख्येचा मोठा भाग असलेल्या मराठयांना प्रशासनात काहीच स्थान नव्हते. संस्थान प्रशासनात ब्राम्हण, पारशी, युरोपियन अशा विशिष्ट वर्गाचेच वर्चस्व प्रस्थापित होण्यामागे कारणेही तशीच होती.

चौथ्या शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत ९ जून १८७१ रोजी महादेव वासुदेव बर्वे या नोकराची कारभारी म्हणून नेमणूक झाली.[६] बर्वे हे उद्दाम व उन्नत नोकरशहा होते. आपल्या चित्पावन जातीचे ते कडवे अभिमानी होते. त्यामुळे त्यांनी आपल्या कारकीर्दीत मामलेदारांपासून सामान्य शिपायांपर्यत ब्राम्हणांची विशेषत: चित्पानवनांची भरती केली. १८८४ मध्ये बर्वे पदावरून गेले आणि त्यांच्याजागी महेरजी तारापूरवाला हे पारशी गृहस्थ आले. त्यांनी पारशी लोकांची भरती सुरू केली.[७]

तत्पूर्वी १९ व्या शतकाच्या सुरूवातीपासूनच हिंदूस्थानातील इतर अनेक राज्यांप्रमाणे कोल्हापूरचे राज्य इंग्रजांच्या प्रभावाखाली जाऊन त्यांचे सार्वभौमत्त्व लयास गेले. त्यामुळे १८९४ च्या सुमारास कोल्हापूर दरबारच्या प्रशासनावर युरोपियन, ब्राम्हण आणि पारशी यांचे प्रभूत्व निर्माण झाले होते.

अनेक वर्षे प्रत्यक्ष राजाचे हाती शासनसूत्रे नसल्याने आणि प्रत्यक्ष नियंत्रण करण्यास राजा नसल्याने हे सर्व अधिकारी अत्यंत बेपर्वा, उद्धट व बेफाम झालेले होते. जहागीरदारांच्या कारभारावर देखरेख करण्यास प्रत्यक्ष राजा नसल्यामुळे पैशाची उधळपट्टी करून ते कर्जात बुडून गेले होते.[८] ब्रिटिश राजनैतिक प्रतिनिधीसुद्धा जुल्मी हुकुमशहा बनला होता.

---

६. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.६७

७. कित्ता -

८. कीर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती-एक समाजक्रांतीकारक राज, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२००१, पृ.क्र.४३

छत्रपती शाहू सिंहासनारूढ काही दिवस होतात न होतात तोच पोलिटिकल एजंट आपल्या दौऱ्यावर जाताना व ते दौऱ्यावरून परत येताना त्यांचे स्वागत करण्यासाठी महाराजांनी स्टेशनवर आले पाहिजे असा वादग्रस्त प्रश्न निर्माण झाला होता.

अशाप्रकारे प्रशासनातील सर्व अधिकारी वर्ग मोठेपणाच्या खोट्या अभिमानाने शेफारून गेला होता. स्वाभाविकपणे छत्रपती या नात्याने शाहूंची राजवट सुरू झाल्यानंतर हे सर्व जहागीरदार व हितसंबधी लोक नवीन राजवटीचा द्वेष करू लागले. ते छत्रपतींच्या आज्ञेवरून तात्काळ वर्तन करत नसत.

सार्वभौम सरकार शिरजोर, राजनैतिक प्रतिनिधी आणि इंग्रज अधिकारी मिजासखोर, मिरासदार बनलेले ब्राम्हण नोकर, बेदरकार वागणारे जहागीरदार अशा गनिमांची एक फळी झालेली आणि त्यांनी रचलेला हा चक्रव्यूह.[९] अशा चक्रव्यूहात शाहू सापडले.

कोल्हापूरचे तुम्ही स्वामी आहात. याची प्रत्येकाला प्रकर्षाने जाणीव करून द्या आणि तुमच्या चांगुलपणाचा फायदा नोकरशहांना घेऊ देऊ नका.[१०] या गुरू फ्रेजर यांच्या सल्यानुसार राजर्षी शाहूंनी मार्गक्रमण केले. या सर्व परिस्थितीवर ताबा मिळविण्यासाठी प्रयत्न केला.

शाहूंच्या कारकीर्दीच्या सुरूवातीस सामाजिक परिस्थितीही खुप दयनीय, हलाखीची होती. धार्मिक स्थिती अधोगतीला गेली होती. देवालयातून भ्रष्टाचार माजला होता. अज्ञान, अंधश्रद्धेमुळे धर्माच्या नावावर पुरोहित, जंगम, उपाध्ये वगैरे लोक गरीब व अडाणी लोकांना लुबाडत होते. स्त्रियांची विशेषत: विधवा स्त्रियांची गुलामगिरी पराकोटीला गेली होती.[११]

---

९. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.६८ - ६९

१०. कित्ता - पृ.क्र.७७

११. नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.१५

सामाजिक परिस्थिती तर याहूनही भयावह होती. मागासलेल्या जाती-जमातीतील लोकांचे जीवन पशूहीन बनले होते. अमानवी वागणूक या लोकांना स्वत:ला उच्चभ्रू समजणाऱ्या ब्राम्हण समाजाकडून मिळत होती.

विशेषत: महार, मांग, वगैरे जातींच्या लोकांचा तर सर्व बाजूंनी कोंडमारा केला जात होता. त्यांना समाजात मोकळेपणाने वावरण्यास, सार्वजनिक ठिकाणी इतरांप्रमाणे वर्तन करण्यास मज्जाव करण्यात आला होता. त्यांचा स्पर्श विटाळ मानला जात असे. सक्तीची गुलामगिरी त्यांच्यावर लादून गलिच्छ कामे करण्यास त्यांना भाग पाडले जात असे. वर्षानुवर्षे हे लोक अज्ञानाच्या अंध:कारात बुडाले असल्याने अन्यायाला बळी पडत होते.

रयतेच्या स्थितीवरून राज्याची स्थिती ओळखायची असते. दारिद्रय, अज्ञान व अंधश्रद्धा यांनी करवीर प्रजेला ग्रासले होते. शेठ-सावकार, शासकीय नोकरचाकर, भटभिक्षूक आणि खोत, पाटील, कुलकर्णी आदी वतनदार तिच्यावर अमानुष अत्याचार करीत होते. मानव असूनही मानवेत्तर प्राण्याहून हीनतर जीवन कंठित असलेली, दुष्काळात अन्नाला मोताद होऊन देशोधडीला लागत असलेली आणि साथीच्या रोगाने मरण पावणारी रयत शाहूंना दिसत होती. त्या तशा दारूण अवस्थेतही ती छत्रपतींना एकमेव आधार मानीत होती.[१२]

अशाप्रकारची संस्थानची एकंदरित परिस्थिती असल्याने छत्रपती या नात्याने संस्थानची अधिकारसूत्रे हाती घेतल्यानंतर आपली ध्येयधोरणे कोणती असावी याचे विचारमंथन करणे महाराजांना क्रमप्राप्तच होते.

## शाहूंची राजकीय विचारसरणी :

राजर्षी शाहू छत्रपतींनी राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतली तेव्हा महाराष्ट्रात तीन प्रकारच्या सामाजिक व राजकीय मतप्रणाली प्रचलित होत्या. महात्मा फुले

---

१२. सुर्यवंशी कृ.गो.- राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.६९

यांचे धोरण सामाजिक सुधारणा प्रस्थापित करणे, जातीभेद नष्ट करणे व दलितोद्धार करणे हे होते. म्हणजे महात्मा फुले यांची सत्यशोधक विचारसरणी लोकहितवादी, रानडे व आगरकर यांची सामाजिक सुधारणाबाबत मतप्रणाली आणि टिळकप्रणीत 'सामाजिक व राजकीय' यामध्ये आधी राजकीय सुधारणा मिळविण्याची विचारप्रणाली असे तीन मतप्रवाह शाहू महाराजांच्या कारकीर्दीच्या प्रारंभी जोर धरून होते.[१३] मात्र यावेळी शाहूंच्यासमोर दोनच मार्ग होते. पहिला इंग्रजांना विरोध करून पूर्वजाप्रमाणे संकट परंपरा व संस्थानास धोका निर्माण करून घेणे व राज्य गमावणे हा एक मार्ग व दुसरा इंग्रजांशी सहकार्य करून संस्थानाच्या बहुजन समाजाला पर्यायाने संस्थानाबाहेरच्या सर्वच बहुजन समाजाला उपयोग करून देणे व त्यांची उन्नती करणे हा दुसरा मार्ग.[१४]

संस्थानामधील प्रजेची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीची दुरावस्था लक्षात घेता महाराजांनी दुसरा मार्ग पसंद केला.

१. बहुजन समाजाच्या हक्कांचे वरिष्ठ वर्गापासून रक्षण करणारी एक दैवी शक्ती म्हणून महाराज ब्रिटिश शासनाकडे पाहत होते. ब्रिटिश शासनाच्या मदतीने बहुजन समाजाचा उद्धार करता येईल याची महाराजांना खात्री होती. त्यामुळे महाराजांचे ब्रिटिश साम्राज्याविषयीचे विचार अभ्यासणे आवश्यक ठरते.

२. महाराजांचा दृष्टीतील स्वराज्य म्हणजे 'जनतेच्या पात्रतेतून व तिला सत्ता वापरता येईल ते राज्य होय.[१५] ब्रिटिश शासनाच्या हातून अधिकारसूत्रे काढून घेऊन ती मूठभर पांढरपेशा ब्राम्हणांच्या हाती देणे याला महाराज स्वराज्य म्हणत नसत. त्यामुळे महाराजांचे स्वराज्यविषयक विचार अभ्यासणे आवश्यक ठरते.

---

१३. नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.१४

१४. कित्ता - पृ.क्र.१३ - १४

१५. साळुंखे पी.बी - राजर्षी शाहू गौरव, ग्रंथ महाराष्ट्र राज्य शिक्षण सचिवालय, मुंबई, १९७६ पृ.क्र.२०३

## ब्रिटिश साम्राज्यविषयक शाहूंचे विचार :

छत्रपती शाहू महाराजांच्या विविध भाषणांचे संदर्भ लक्षात घेतले असता ब्रिटिश साम्राज्यविषयक त्यांची मते स्पष्ट होतात. महाराजांच्या मते ब्रिटिश शासनाने सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यामुळे आपली बरीच प्रगती झाली आहे. २७ डिसेंबर १९१७ च्या अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अकराव्या अधिवेशनात अध्यक्ष या नात्याने केलेल्या आपल्या भाषणात महाराज म्हणतात, "इ.स.१८५७ सालानंतर प्रजावत्सल ब्रिटिश सरकारने सर्वांना सरसहा शिक्षणाची द्वारे खुली केली आहेत आणि त्यामुळे मला वाटते आम्ही बरीच प्रगती केली आहे."[१६]

इंग्रजी राजवटीच्या पूर्वीची शिक्षणक्षेत्रावर प्रस्थापित झालेले ब्राम्हण वर्गाचे वर्चस्व आणि त्यामुळे निर्माण झालेल्या अडचणी स्पष्ट करून इंग्रजी राजवटीनंतर शैक्षणिक फायद्याची बाजू समजावून सांगताना महाराज म्हणतात, "आमच्या शिक्षणाला पूर्वी इतक्या अडचणी होत्या की, खुद्द सातारचे महाराजांना मध्यरात्री शिक्षण घ्यावे लागत असे. मग इतरांची ती काय व्यथा? परंतु तो काळ आता उरलेला नाही. आम्हाला लिहिणे, वाचणे, शिकण्यास प्रतिबंध नाहीसा झाला आहे. याचे कारण आपणा सर्वांकडे समदृष्टीने पाहणारे इंग्रजी एकछत्री राज्य हे होय. याकरिता आपण त्यांचे जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत."[१७]

महाराजांच्या मते, इंग्रजी साम्राज्याची स्थापना झाल्यानंतर शिक्षणावरील उच्चवर्णीयांची मक्तेदारी संपुष्टात आली. सर्वांना शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला. शिक्षणामुळेच आपला विकास झाला. तेव्हा आपण यासाठी इंग्रजांचे आभार मानले पाहिजे. महाराजांच्या मते, "इंग्रजी शिक्षणापासून भारतवासियांना तिसरा डोळा आला आहे. त्यामुळे आम्ही कोण होतो? आमची काय स्थिती होती? आता काय स्थिती आहे?

---

१६. जाधव भ.बा. - राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ.क्र.३

१७. कित्ता - पृ.क्र.१५- १६

पुढे काय स्थिती होईल वगैरे गोष्टींचे ज्ञान आम्हाला होत आहे."[१८]

महाराजांच्या मतानुसार शिक्षण ही सर्व सुधारणांची गुरू किल्ली आहे. शिक्षणामुळेच व्यक्तीला सारासार विचार करण्याची पात्रता येते. व्यक्ती आपले हित-अहित समजू शकते. व्यक्तीचा विकास साधण्यासाठी तिला शिक्षण दिले पाहिजे. भारतीय समाजव्यस्थेतील वर्णव्यवस्थेच्या बंधनामुळे ब्राम्हण सोडून इतरांना शिक्षणाचा अधिकार कुणालाही नव्हता. मात्र ब्रिटिश राजवटीत सर्वांना शिक्षणाची संधी आहे. या शैक्षणिक संधीमुळे व्यक्तीला आपला विकास साधता येईल. हे सत्य शाहूंनी जाणले होते. त्यामुळेच शाहूंनी शिक्षणप्रसाराच्या कार्यास प्राधान्य दिले होते.

इंग्रजांच्या उदारमतवादी धोरणामुळे भारतात शिक्षण प्रसार झाला असे महाराजांचे मत होते. इंग्रजांच्या शिक्षणप्रसारामुळे नवीन विचारांचे वारे भारतात वाहू लागले. त्यामुळे भारतात समाजसुधारक विचारवंत निर्माण झाले असे महाराजांचे म्हणणे होते.

डिसेंबर १९१८ च्या नवसारी येथील आर्यधर्म परिषदेच्या आपल्या भाषणात महाराज म्हणतात, "इंग्रज विद्याखाते स्थापन होऊन लोकांमध्ये नवीन विचारांच्या प्रसारास सुरूवात केली. त्याकाळी धर्मसुधारक असे तीन पुरूष प्रामुख्याने उदयास आले. ते महर्षी श्री स्वामी दयानंद, बाबू केशवचंद्रसेन व जोतीराव गोविंदराव फूले हे होत."[१९]

शिक्षणामुळे व्यक्तीमंध्ये विचारप्रक्रियेस सुरूवात होते. शिक्षणामुळे व्यक्तीला आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचे, विषमतेचे ज्ञान होते. त्यामुळे अन्यायाचे, विषमतेचे परिमार्जन करण्यासाठी व्यक्ती प्रस्थापित व्यवस्थेविरूद्ध बंड करते. त्यामधून समाजसुधारक, विचारवंत निर्माण होतात असे महाराजांचे मत होते.

प्रेमाने व सामंजस्याने जे काम होते ते संघर्षाने होत नाही या तत्त्वावर महाराजांचा विश्वास होता. त्यामुळे इंग्रज सरकारप्रती सामजंस्याच्या, संयमीपणाच्या

१८. कित्ता - पृ.क्र.४१
१९. कित्ता - पृ.क्र.३१

मार्गाचा वापर करा व आपल्या मागण्या मान्य करून घ्या अशा उपदेश करताना महाराज म्हणतात, "ज्यांनी आम्हाला विद्यामृत पाजिले ते आम्हाला पारतंज्यातून (बेडा) खात्रीने मुक्त करतील. तुम्हाला जे काही पाहिजे आहे ते ज्याप्रमाणे मूल आई-बापाजवळून घेते. त्याप्रमाणे म्हणजे प्रेमाने व जोराने सरकारजवळ मागा ते सरकार खात्रीने देईल."[२०]

यावरून असे म्हणता येईल की शाहूंचा शांततेच्या सनदशीर मार्गावर विश्वास होता. ब्रिटिशांच्या अस्पृश्योद्धाराच्या मानवतावादी दृष्टीकोनाचा व समानतेच्या तत्वाचा गौरव महाराजांनी अनेक भाषणाच्या माध्यमातून केला आहे.

नागपूर येथील ३० मे १९२० च्या अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषदेच्या आपल्या भाषणात महाराज म्हणतात, "इंग्लिश राष्ट्राचे आमच्या देशावर व विशेषकरून आमच्या अस्पृश्य मानलेल्या बंधूंवर फार उपकार आहेत. या राष्ट्राने मनुधर्म शास्त्रासारखे एका जातीचे प्राबल्य स्थापन करणारे कायदे काढून टाकून सर्व हिंदी प्रजेमध्ये समसमान हक्क निर्माण केले. ब्राम्हणांस फाशी देऊ नये, त्यास लग्न कार्यात, अध्ययनात, वृत्तीत, दानधर्म, पूजाअर्चा वगैरे हरएक बाबतीत परमेश्वराचे योग्यतेचे मानून दुसऱ्या सर्व जातींस तुच्छ कस्पाटासमान व ब्राम्हणांची सेवा करण्याकरिता निर्माण केलेले आहे. अशा तऱ्हेच्या कायद्यात, रूढीत, आचारांत व धर्मात प्रतिबंध घातला...... डोळे काढावे, डागावे, वेद वाचू नयेत असे जे अमानुष कायदे ऐकेकाळी मनूने रूढ केले होते, ते हल्ली इंग्रज सरकारांनी नाहीसे केले आहेत."[२१]

महाराजांना समाजातील जातीभेदाचा आणि त्यामाध्यमातून निर्माण झालेल्या उच्च नीच्चतेचा प्रचंड तिटकारा होता. जाती भेदाच्या आधारावर उच्च नीचता निर्माण होऊन न्याय पक्षपाती बनला होता. या पक्षपाती न्यायाविषयी महाराजांना घृणा होती. महाराज नि:पक्षपाती न्यायाचे पुरस्कर्ते होते. कायद्यासमोर प्रत्येक व्यक्ती समान असावी असे महाराजांना वाटत होते. यावरून महाराजांचा कायद्यावर असणारा विश्वास आणि

२०. कित्ता - पृ.क्र.३९
२१. कित्ता - पृ.क्र.९०

घटनात्मक दृष्टीकोन व्यक्त होतो.

ब्रिटिशांच्या उदारमतवादी तत्त्वांचा पुरस्कार करताना महाराज म्हणतात, "ब्रिटिश राजवटीत सर्व जनतेला समान हक्क आहेत यामध्ये जातीभेदावर आधारित कमी अधिक शिक्षा असा अन्यायपरिपोषक कायदा नाही. ब्रिटिश मिशनऱ्यांनी आपल्या देशात शाळा काढल्या व आपल्या देशातील अस्पृश्य मुलांना या शाळेत फार ममतेने वागविले जाते. अशाप्रकारे न्यायी युरोपखंडातील हॉलंड, बेल्जियम वगैरे देश आपल्या ताब्यातील परदेशचे लोकांना शिक्षण वगैरे देऊन उन्नती करीत नाही. पण इंग्रज लोकांचे याकामी फार लक्ष आहे."[२२]

ब्रिटिश शासनाच्या मानवतावादी दृष्टीकोनाचा पुरस्कार करण्यामागे महाराजांचा इतकाच उद्देश होता की, अस्पृश्य, मागासलेले असे म्हणून आपला बांधवाचा तिरस्कार करण्यापेक्षा त्यांना देखील बरोबरीचे हक्क देऊन वागवा हा छत्रपती शाहूंचा उदारमतवादी दृष्टीकोन याठिकाणी दिसून येतो.

महाराजांच्या मते, "समता, बंधुता व स्वातंत्र्य यांचे उगमस्थान ब्रिटिश राष्ट्र आहे."[२३] सरकारबरोबर असहकारिता करणे म्हणजेच आपली उन्नति खुंटविणे आहे व समाजाचा मुळ पायाच खणून काढणे आहे.

व्यक्तिमत्त्वविकासासाठी आवश्यक व महत्त्वाची मूल्ये म्हणून लोकशाहीच्या न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना आधुनिक काळात महत्त्वाचे स्थान आहे. शाहूंच्या वरील उद्गावरून असे लक्षात येते की, स्वातंत्र्याच्या ५० वर्षे पूर्वी कोल्हापूरच्या या राजाला लोकशाही मूल्यांशी खूपच बांधिलकी होती. लोकशाही मूल्यांच्या अभावी व्यक्तीची उन्नती खुंटते व समाजाचा मुळ पायाच खणला जातो. असे महाराजांचे म्हणणे होते. यावरून असे म्हणता येईल की, न्याय, स्वातंत्र्य, समता या लोकशाही मूल्यांवर शाहूंचा विश्वास तसेच श्रद्धा होती.

---

२२. कित्ता - पृ.क्र.९०-९१
२३. कित्ता - पृ.क्र.७९

ब्रिटिशांच्या सनदशीर मार्गावर विश्वास असल्याने ब्रिटिश साम्राज्याचा तिरस्कार न करता त्यांना सहकार्य करून स्वत:ची उन्नती करून घेण्याचा उपदेश करताना महाराज म्हणतात- "आपण गरीब लोकांनी इतर गोष्टीत वेळ वाया न घालवता इंग्रज सरकारच्या मदतीने शिक्षणविषयक उन्नती करून घेऊन स्वत:च्या पायावर उभे राहिले पाहिजे. सरकारबरोबर आपणास असहकारिता करावयाची नसून जे आपणांशी असहकारतेने वागतात त्यांचेशीच असहकारिता केली पाहिजे."[२४]

यावरून असे लक्षात येते की, शिक्षणामुळेच सर्वांचा उद्धार होऊ शकतो यावर महाराजांचा विश्वास होता. यासाठी आपल्या देशातील उच्चवर्गीय मदत करतीलच याची शाश्वती महाराजांना नसल्याने त्यांनी इंग्रज सरकारच्या मदतीने शिक्षणविषयक उन्नती करण्याचा व त्यामाध्यमातून स्वत:च्या पायावर उभे राहण्याचा उपदेश केला. शिक्षणाशिवाय बहुजन समाजाचा उद्धार होणार नाही हे सत्य शाहूंनी जाणले होते.

हिंदूस्थानचे (भारतीयांचे) रक्षण ब्रिटिश सरकारकडून अनेकवेळा झाले आहे याचा दाखला देऊन सध्याच्या लढाईत आपण त्यांना मदत केली पाहिजे असे महाराजांचे मत होते. हे समजावून सांगताना महाराज म्हणतात, "हिंदूस्थानचे रक्षण ब्रिटिश सरकारकडून अनेकवेळा झाले आहे. ख्रिस्तीधर्मीय लोकांकडून जरी आमचा छळ झाला. तथापि आमचे संरक्षण करण्यास ब्रिटिश सरकारच कारण झाले. त्याचप्रमाणे रशियन लोक जोरात असताना त्यांच्यापासून अगर अफगाण लोकांपासून हिंदूस्थानवर संकट येण्याचा संभव दिसला. तेव्हांदेखील ब्रिटिश सरकारनी आपल्या सेनेची आहुती देऊन आमचा बचाव करण्यास मागे पुढे पाहिले नाही."[२५]

महाराजांच्या मते, बाह्य आक्रमणापासून भारतीय जनतेचे संरक्षण करण्याची जबाबदारी ब्रिटिशांनी योग्यप्रकारे पार पाडली आहे. तेव्हा हल्लीच्या लढाईने आपणास साम्राज्याची सेवा करण्याची सुसंधी आणून दिली आहे. असली संधी पूर्वी कधी

२४. कित्ता - पृ.क्र.१२५
२५. कित्ता - पृ.क्र.९७

आली नव्हती व पुढे कदाचित येणार नाही. अर्थातच अशा प्रसंगी आपल्या सरकारला मदत करणे हे सर्व जातीच्या व पंथाच्या लोकांचे कर्तव्य आहे. तेव्हा आपण सर्वांनी आपआपसातील भेदभाव विसरून ब्रिटिश सरकारला मदत करायला हवी. [२६]

ब्रिटिश शासनाच्या जमेच्या बाजू व सुधारणा लोकांसमोर विशद करताना महाराज म्हणतात, "इंग्रजी सरकारचे राज्य १८५७ सालानंतर या देशावर चिरस्थायी झाले. त्या वेळेपूर्वी आम्ही जवळ जवळ रानटी स्थितीत होतो. रेल्वे नव्हत्या, तार ऑफिसे नव्हती, धर्मसहिष्णूता व नियमितपणा याही गोष्टीस आपण पारखेच होतो. स्वराज्य मागण्याइतकी लायकी आपणास सामाजिक व धार्मिक सुधारणा इंग्रजांनी घडवून आणली. हि गोष्ट आम्हांस केव्हांही विसरता येणे शक्य नाही."[२७]

तसेच पुढे महाराज म्हणतात की, "प्रजेच्या कल्याणाप्रीत्यर्थ सुसंस्कृत राज्यपद्धतीची व निरलस परिश्रमाची जर काठे संस्थानात स्पष्ट चिन्हें दिसत असतील तर त्याचे सर्व श्रेय कार्यक्षम ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या नेतृत्त्वाखालील वरील मुदतीत जे उत्कृष्ट कार्य झाले त्यालाच दिले पाहिजे."[२८]

यावरून परकीय सत्तेच्या सकारात्मक कार्याची दिलखुलास प्रशंसा करणारा छत्रपती शाहू हा मोठया मनाचा, दिलदार राजा होता असे म्हणता येईल. भारतात इंग्रजी राजवटीचे दुष्परिणाम सर्वानीच विशद परंतु त्यांच्या सुधारणा विशद करताना सर्वानाच संकोच वाटला. दुसऱ्याचे दोष हे सर्वांनाच दिसतात परंतु दुसऱ्याच्या चांगल्या गुणांची प्रशंसा काहीच लोक करतात. परंतु छत्रपती शाहू चांगल्या गुणांची दिलखुलासपणे प्रशंसा करीत असत.

वरीलप्रकारच्या ब्रिटिश साम्राज्यविषयक शाहूंच्या विचारावरून असे स्पष्ट होते की, भारतीय समाजव्यवस्थेत प्राचीन काळापासून अस्तित्वात असणाऱ्या

२६. कित्ता - पृ.क्र.८
२७. कित्ता - पृ.क्र.१०६
२८. कित्ता - पृ.क्र.१९२

वर्णव्यवस्थेमुळे समाजातील खालच्या वर्गावर खूपच अन्याय झाला. ब्रिटिशांचे साम्राज्य भारतात स्थापन झाल्यानंतर त्यांनी व्यक्तींमध्ये जात, धर्म, पंथ इत्यादी बाबतीत भेदभाव न करता सर्वांना स्वत:च्या स्वार्थासाठी का असेना शिक्षणाची समान संधी दिली.

महाराजांच्या मते, शिक्षण हि सर्व सुधारणांची गुरू किल्ली आहे. ब्रिटिश शासनाने सर्वांना शिक्षणाची समान संधी देऊन विकासाचा मार्ग दाखविला आहे. तेव्हा गरीब व मागासलेल्या वर्गांनी इतर कोणत्याही गोष्टीत वेळ वाया न घालवता इंग्रज सरकारच्या मदतीने आपली शैक्षणिक प्रगती करावी, शैक्षणिक प्रगतीनंतर सामाजिक, आर्थिक, राजकीय विकास आपोआपच होईल असे महाराजांना वाटत होते.

महाराजांच्या मते, "ब्रिटिश साम्राज्याच्या शैक्षणिक सामाजिक उदार धोरणामुळे सनातनी ब्राम्हणशाहीच्या जुलमी जोखडातून अस्पृश्यांची सुटाका झाली. इंग्रज भारतात आले नसते तर कुत्र्या-मांजराचे जीवन जनतेला कंठावे लागले असते. याच ऐतिहासिक सत्यामुळे ब्रिटिश साम्राज्याशी महाराज सबुरीचे धोरण ठेवीत असत."[२९]

वरील प्रकारच्या इंग्रजांविषयी किंवा ब्रिटिश साम्राज्याविषयक धोरणांमुळे छत्रपती शाहू महाराजांवर ब्रिटिश धार्जिणेपणाचा आरोप केला जातो. दादाभाई नौरोजी, ना. गोपाळ कृष्ण गोखले, न्या. रानडे यांनी इंग्रजांशी सहकार्य करून सार्वजनिक कार्ये केली. मग शाहू महाराजांचे इंग्रजांशी सहकार्याचे धोरण समर्थनीय का ठरत नाही.[३०]

छत्रपती शाहू ब्रिटिश राजसत्तेच्या नियंत्रणाखाली राज्यकारभार करणारे एक मांडलिक राजे होते. त्यांना ब्रिटिश शासनाने आखून दिलेल्या राजसत्तेच्या मर्यादित राहूनच राज्यकारभार करणे अपरिहार्य होते. त्यामुळे त्यांच्या कार्यावर बऱ्याचशा मर्यादाही पडत होत्या. शाहू छत्रपतींनी ब्रिटिशांच्या विरोधात पवित्रा घेतला असता तर ब्रिटिशांनी त्यांना एखाद्या आरोपात गोवून एखाद्या अंधाऱ्या कोठडीत घालून मारून टाकलं

---

२९. कित्ता - पृ.क्र.१०१

३०. नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.१४

असतं व कोल्हापूरच्या राजघराण्याला नालायक ठरवून संस्थानही खालसा करून टाकले असते. त्यामुळे गव्हर्मेटच्या हातात स्वत:ला नेस्तनाबूद करता येणार असे कसलेही हत्यार पडू न देण्याविषयी महाराज अत्यंत सावध होते.

हे करत असताना इंग्रज सरकारविषयी राजनिष्ठा वारंवार व्यक्त करणे हा त्यांच्या राजनैतिक कर्तव्याचा एक भाग होता आणि म्हणूनच शाहू महाराज वरिष्ठ इंग्रज अधिकाऱ्यांच्या भेटीगाठीत त्यांच्याशी झालेल्या पत्रव्यवहारात तसेच सार्वजनिक सभांमध्ये आपली राजनिष्ठा शब्दाशब्दांत व्यक्त करताना दिसतात.

त्याकाळी सशस्त्र क्रांतीकारकांचा गट सोडल्यास त्या काळात देशातील कोणत्याही पक्षाचा नेता आपण राजनिष्ठ नाही असे म्हणू शकत नव्हता. कारण राजनिष्ठा नसणे हा त्याकाळी 'राजद्रोह' समजला जात होता आणि अशा 'राजद्रोहयास' उघडपणे कोणतीही राजकीय अथवा सामाजिक चळवळ चालविणे केवळ अशक्य होते.[३१] शाहूंना राज्यसत्तेच्या माध्यमातून मागासलेल्या वर्गाचा विकास करावयाचा होता. त्यांचा दर्जा वाढवायचा होता. त्यामुळे त्यांना ब्रिटिशांशी सुबरीचे धोरण ठेवणे क्रमप्राप्त होते.

तरीही राजर्षी शाहू छत्रपतींची ब्रिटिश साम्राज्याशी असणारी 'राजनिष्ठा' ही निखळ स्वरूपाची होती असे म्हणता येणार नाही. कारण कोणीही सच्चा देशभक्त आपली मातृभूमी परकीय सत्तेच्या अंमलाखाली कायमस्वरूपी राहावी अशी इच्छा अंतर्यामी करणार नाही. मात्र आपल्या बहुजन समाजातील लोकांच्या हक्कांचे वरिष्ठ वर्गापासून संरक्षण करण्याची एक दैवी शक्तीची योजना म्हणून इंग्रज राजसत्तेकडे महाराज पाहत होते. मात्र ती चिरकाल टिकावी असे त्यांना कधीच वाटले नाही.

---

३१. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.क्र.१८२

## महाराजांचे स्वराज्यविषयक विचार :

महाराजांचे स्वराज्यविषयक विचार अभ्यासताना असे लक्षात येते की महाराजांच्या दृष्टीतील स्वराज्य म्हणजे, ब्रिटिश शासनाकडून अधिकारसूत्रे काढून घेऊन ती पांढरपेशा ब्राम्हण समाजाच्या हाती देणे याला महाराज स्वराज्य म्हणत नव्हते. महाराजांच्या मते जनतेच्या पात्रतेतून तिला वापरता येईल ते राज्य होय.

'स्वराज्यविषयक आपले विचार स्पष्ट करताना महाराज म्हणतात, आम्हाला स्वराज्य हवे आहे आणि ते मिळावे अशी माझी खरोखरच इच्छा आहे. पण त्यासाठी सर्वप्रथम स्वराज्याचे हक्क उपभोगण्याची लायकी बहुजन समाजाच्या ठिकाणी हवी. स्वराज्यासाठी आवश्यक पात्रता प्रतिपादीत करताना खामगावच्या दि. २७ डिसेंबर १९१७ च्या आपल्या भाषणात महाराज म्हणतात, " 'स्वराज्य' अशी ओरड चोहोंकडे ऐकू येत आहे. आम्ही स्वराज्यास पात्र आहोत किंवा नाही हाच एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. स्वराज्य आम्हांला पाहिजे आहेच. त्या योगानेंच आमच्यात चैतन्य उत्पन्न होई ल. परंतु ...जोपर्यत आमच्यामध्ये जाती-जातीतील मतभेद आणि मत्सर जिवंत आहे तोपर्यत आम्ही आप आपसात झगडत राहणार आणि आमच्या हितवृद्धीस अपाय करून घेणार. आमच्यातील अंतस्थ कलह नाहीसे करण्यास आणि आम्हांला स्वराज्यास पात्र करून घेण्याकरिता ही अनर्थकारक जातीपद्धती झुगारून देणे आम्हांला अत्यंत आवश्यक आहे."[३२]

स्वराज्यासाठी प्रथम आपणामध्ये आप-आपसात असणारे जातिभेद नष्ट झाले पाहिजेत. आप-आपसात असणारे अंतर्विरोध संपुष्टात आले पाहिजे. तरच आपण स्वराज्यासाठी पात्र होऊ अशी महाराजांची भूमिका होती. महाराजांच्या मते, जितक्या लवकर आपण आपली जातीबंधने तोडून टाकू तितक्या लवकर आम्ही स्वराज्यास पात्र होऊ. त्यासाठी समाजातील उच्चवर्णियांनी पुढाकार घ्यायला हवा.

---

३२. जाधव भ. बा. - राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ. क्र. ३ - ४

वरील प्रकारची आपली भूमिका लोकांना समजावून सांगण्यासाठी महाराजांनी जपानमधील सामुराई जातीने जातीपद्धती नष्ट करण्यासाठी घेतलेल्या पुढाकाराचा दाखला आपल्या अनेक भाषणाच्या माध्यमातून लोकांसमोर ठेवला आहे. असे दाखले लोकांसमोर ठेवण्यामागे महाराजांचा उद्देश असा होता की, देशातील जातीपद्धती नष्ट करण्यासाठी ब्राम्हण वर्गाने, क्षत्रियांनी पुढाकार घ्यावा. भेदभाव नष्ट होऊन सर्वांनी बंधुभावाने एकत्र रहावे.

नाशिक येथील १५ एप्रिल १९२० च्या आपल्या भाषणात महाराज म्हणतात, "जपानमधील सामुराई लोकांनी आपण जन्माने प्राप्त झालेला उच्च दर्जा सोडून दिला म्हणून जपानमध्ये ऐक्य होऊन त्या देशाची उन्नती झाली. त्याचप्रमाणे ब्राम्हणांनी जाति मत्सर सोडल्याशिवाय आमच्या लोकांची उन्नती होणार नाही. सर्व जातींना हात देऊन त्यांना आपल्याबरोबर घेऊन सर्वांची स्थिती सुधारणे हे काम क्षत्रियांनी अवश्य केले पाहिजे हे त्याचे कर्तव्य आहे."[३३]

यावरून महाराज समताधिष्ठत समाजाचे पुरस्कर्ते होत असे लक्षात येते. समाजातील सर्व प्रकारचे भेदभाव नष्ट व्हावेत यासाठी समाजातील पुढारलेल्या वर्गाने समाजातील मागासलेल्या वर्गाकडे मदतीचा हात पुढे करावा. त्यांचा उद्धार करावा असे महाराजांचे मत होते. सर्व समाज एका समान पातळीवर यावा. त्यामध्ये उच्च नीच असा जातीभेदावर आधारित भेदभाव नसावा असे महाराजांचे म्हणणे होते.

सध्या आहे त्या परिस्थितीत स्वराज्य मिळावे असे महाराजांना वाटत नव्हते. जर सध्या आहे त्या परिस्थितीत स्वराज्य मिळाले तर त्याचे दुष्परिणाम स्पष्ट करताना महाराज म्हणतात, "जर हल्लीची जातीव्यवस्थाच कायम राहिली तर ज्यारीतीने हल्ली स्वराज्याचा अर्थ समजला जातो ते स्वराज्य मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे हे होय."[३४]

---

३३. कित्ता - पृ.क्र.६७
३४. कित्ता - पृ.क्र.६ -७

छत्रपती शाहूंना मूठभर लोकांच्या हाती सत्ता देणे पसंद नव्हते. समाजातील प्रत्येक घटकाला सत्तेत वाटा मिळावा, प्रत्येकाला प्रतिनिधीत्वाची संधी मिळावी अशी महाराजांची इच्छा होती.

छत्रपती शाहूंच्या स्वराज्यविषयक विचारांचा विपर्यास करून छत्रपती शाहू स्वराज्य विरोधी आहेत. ते आपल्या जनतेला स्वराज्याचे हक्क देण्यास तयार नाहीत, अशा अफवा त्यांच्या विरोधकांनी सर्वत्र पसरविल्या होत्या. या आरोपांचे खंडन करताना व आपले स्वराज्यविषयक विचार प्रकट करताना नाशिक येथील एप्रिल १९२० च्या आपल्या भाषणात महाराज म्हणतात, "मी माझ्या लोकांस स्वराज्य देण्यास बिलकूल कबूल नाही. हा आरोप अगदी खोटा असून तो माझ्याविषयी गैरसमज निर्माण व्हावा यासाठी करण्यात आला आहे. ज्या भाषणासंबंधाने हा आरोप करण्यात येतो ते भाषण करताना मी म्हणाले, "बहुजन समाजाचा शिक्षण बाबतीतला दर्जा वाढून वरिष्ठ वर्गाच्या बरोबरीने अंशत: तरी तो आल्याशिवाय सुधारणेच्या दिशेने माझ्या संस्थानच्या राज्यकारभारात लोकांस हक्क देण्याविषयीचा बदल करण्याला हात घालणेस मी धजणार नाही."[३५]

सर्वांना बरोबरीचा दर्जा देण्यासाठी सर्वप्रथम सर्वांना शिक्षण दिले पाहिजे. सर्व सुधारणांचे मुळ शिक्षणच आहे. असे महाराजांचे म्हणणे होते.

त्यामुळे शिक्षित समाजाच्या हाती जनतेच्या हाती स्वराज्य देण्याचा आपला मानस प्रकट करताना महाराज म्हणतात, "निदान प्राथमिक तीन इयत्तांपर्यंत प्रत्येक माणसाचे शिक्षण झालेच पाहिजे. तितकेच शिक्षण झाले की, आपण आपले राज्य लोकाच्या स्वाधीन करू."[३६] शिक्षण प्रसाराच्या माध्यमातून छत्रपती शाहू महाराज यांनी ब्राम्हणेत्तरांमध्ये जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांना समाजकारण व राजकारण या दोन्ही क्षेत्रात आपल्या हक्कासाठी उभे करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

महाराजांनी केवळ शिक्षित जनतेच्या हाती स्वराज्याचे अधिकार देण्याचा

---

३५. कित्ता - पृ.क्र.७२
३६. कित्ता - पृ.क्र. १८ (पुरस्कार)

मानस प्रकट केला व तोंडाची वाफ दवडली असे नाही. स्वराज्यासाठी आवश्यक असणारी पात्रता निर्माण करण्यासाठी छत्रपती शाहूंनी शिक्षणप्रसाराच्या कार्यास अग्रक्रम दिला. याच एप्रिल १९२० च्या नाशिक येथील आपल्या भाषणात महाराज म्हणतात, "माझ्या रयतेमध्ये प्राथमिक शिक्षण व उच्च शिक्षण प्रसार करण्याची इतकी जोराने खटपट चालली आहे, यावरून शक्य तितक्या लवकर रयतेस स्वराज्य देण्याचे माझे धोरण आहे... पण माझी प्रजा ही जबाबदारी घेण्यास अगोदर पुर्णपणे पात्र नसली तर अंशत: तरी पात्र झाली पाहिजे. म्हणजे रयतेतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश मिळाला पाहिजे असे माझे मत आहे."[३७]

शिक्षित व्यक्तीच स्वराज्याचा उपभोग योग्य प्रकारे घेऊ शकतील. समाजातील ठराविक वर्ग शिक्षित व इतर वर्ग अशिक्षित राहिले तर या लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन शिक्षित लोक स्वराज्याचा उपयोग स्वत:च्या फायद्यासाठी करतील. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाला किमान प्राथमिक शिक्षण मिळावे असे महाराजांना वाटत होते.

छत्रपती शाहूंचे शिक्षण कार्य हे समाजातील बहुजन वर्गासाठी होते. प्रजा सुबुद्ध व्हावी, जागृत व्हावी, ती आपल्या हक्क कर्तव्यासाठी जागृत व्हावी हा त्यापाठीमागे प्रमुख उद्देश होता. प्रजा शिक्षित झाल्यानंतर तिने राज्यकारभार करण्यासाठी सहकार्य करावे. तिने आपल्या उद्धारासाठी स्वत:च्या पायावर उभे रहावे या हेतूने प्रेरित होऊन त्यांनी शिक्षण प्रसार केला.

अज्ञानामुळे व्यक्तीला किती वाईट परिस्थितीला सामोरे जावे लागते हे महाराजांनी जाणले होते. काही शिक्षित व्यक्ती स्वत:च्या फायद्यासाठी इतरांना कशाप्रकारे तुच्छ, कस्पाटासमान मानून पशूहीन जीवन जगण्यास भाग पडते हे पटवून देताना महाराज म्हणतात, "रयतेमधील मोठा भाग अडाणी राहिला व थोडेसे लोक विचारसंपन्न झाले व प्रजेस अधिकार दिले तर या थोडया लोकांच्या हाती सत्ता

३७. कित्ता - पृ.क्र. ७४ - ७५

पडणार व एक स्वदेशी ब्यूराक्रसी तयार होणार."[३८]

या सुशिक्षित ब्यूराक्रसीच्या कारभाराची कल्पना देताना महाराज म्हणतात, "या सुशिक्षित ब्युराक्रसीचा कारभार आमच्या ओळखीचा आहे. फार लांब कशाला मराठयांचा इतिहासच पहा. शाहू महाराजांची भूल होऊन पेशव्यास अधिकाधिक सत्ता बळकावण्यास संधि मिळाली. याचा परिणाम छत्रपतींचा कारागृहवास हा झाला. जातीभेद तीव्र झाले. जातीमत्सर वाढला व अस्पृश्यांस तर गळयात गाडगे व कंबरेस फेसाटी बांधून फिरावे लागे. हा प्रसंग कोठेही पुन्हा येणे चांगले नाही. याकरिता अधिकारदान करण्यापूर्वी सर्व लोकांत विद्याप्रसार करण्याकडे अगोदर लक्ष देणे जरू आहे."[३९]

वरील उद्‌गारावरून असे लक्षात येते की, अज्ञानामुळे ब्राम्हणी अल्पसंख्यांकांचे वर्चस्व समाजावर पुन्हा प्रस्थापित होऊ नये असे महाराजांना वाटत होते. अज्ञानामुळे सामान्य जनतेची परवड होऊ नये यासाठी महाराज आवश्यक ती दक्षता घेत होते. समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षण दिले तर त्यांना आपले हितसंबंधांच्या रक्षणासाठी लढण्याचे बळ मिळेल. सत्तेमध्ये वाटा मिळेल. अन्यथा अज्ञानामुळे पेशवाई परत येईल व मागासलेल्या लोकांचे जगणेच असह्य होईल याची महाराजांना भीती होती.

महाराजांच्या मते, "आधी राजकीय सुधारणा कि आधी सामाजिक सुधारणा हा वाद सामंजस्याचा नाही कारण या दोन्हीं सुधारणा राष्ट्रोन्नतीच्या गाड्याची दोन चाके आहेत."[४०]

सत्ता केवळ अल्पसंख्य उच्चवर्णीयांच्या हातात जाउ नये. इतर बहुजन समाजातील लोकांनाही राजकीय सत्तेत स्थान मिळावे यासाठी 'जातवार' प्रतिनिधीत्वाची मागणी महाराज करतात. जातवार प्रतिनिधीत्त्वाची संकल्पना व त्याची आवश्यकता

---

३८. कित्ता - पृ.क्र.७५
३९. कित्ता
४०. कित्ता - पृ.क्र.७६

प्रतिपादीत करताना महाराज म्हणतात, "सत्ता केवळ अल्पसंख्यांक उच्चवर्णियांच्या हातात जाण्यात स्वराज्याचे पर्यवसान होऊ नये म्हणून निदान दहा वर्षेपर्यत तरी आम्हाला जातवार प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क असला पाहिजे. यामुळे आमचे हक्क काय आहेत याचे आम्हाला शिक्षण मिळेल. एकवार ते आम्हाला समजले म्हणजे जातवार प्रतिनिधीत्वाची जरूरी राहणार नाही."[४१]

जातवार प्रतिनिधीत्व हि संकल्पना स्पष्ट करताना मागासलेल्या जातींना कायदेमंडळात मिळणारे प्रतिनिधीत्व इतका संकूचित अर्थ लक्षात न घेता "सर्व जातीचे लोक पुढे येऊन सामाजिक,औद्योगिक,शिक्षणविषयक, सरकारी नोकरी वगैरे सर्व बाबतीत आपापली जबाबदारी पुरी पाडण्याचे सामर्थ्य येणे याला मी 'जातवार प्रतिनिधीत्व' (Communal Representation) म्हणतो' असे महाराजांनी स्पष्ट केले होते."[४२]

स्वातंत्र्यानंतर मागासलेल्या जाती-जमातीच्या जर उद्धार करावयाचा असेल तर त्यांना काही खास सोयी-सवलती दिल्या पाहिजेत याची जाणीव घटनाकारांना झाल्यानंतर त्यांनी घटनेत खास तरतूदी केल्या. परंतु स्वातंत्र्याच्या ५० वर्षापूर्वी मागासलेल्या जाती-जमातींना, मागासलेल्या समाजाला जर पुढे आणायचे असेल तर त्यांना खास सोयी सवलती दिल्या पाहिजेत याची जाणीव छत्रपती शाहूंना झाली होती. त्यामुळेच जातवार प्रतिनिधीत्वाची मागणी ते करतात. वरील प्रकारच्या मागणीमुळे शाहूंचा दूरदृष्टीपणा लक्षात येतो.

जूलै १९२० च्या हुबळी येथील आपल्या भाषणात महाराज म्हणतात, "चेम्सफर्ड मॉन्टेग्यू रिफॉर्मप्रमाणे आम्हांला स्वराज्य मिळत आहे. एवढे ही स्वराज्य कोणत्याही पूर्वीच्या कॉकरापासून मिळाले नव्हते. याचा आम्ही दुरूपयोग न करिता सदुपयोग करून आमच्या बादशहास दाखविले पाहीजे........... आम्ही योग्य पुढारी नेमून दिले पाहिजेत व रिफॉर्म यशस्वी करून दाखविल्या पाहिजेत. जर अयोग्य व अविचारी

४१. कित्ता - पृ.क्र.७
४२. कित्ता - पृ.क्र.७१

पुढारी नेमले तर त्यांचे दुष्परिणामास आम्हींच जबाबदार होऊ, सरकार होणार नाही हे लक्षात ठेविले पाहिजे व आपली सामाजिक व धार्मिक उन्नती करून घेतली पाहिजे. म्हणजे आमच्यांमध्ये जे पुष्कळसे जातीभेदामुळे पक्ष झाले आहेत ते मोडले पाहिजेत. सर्वांना समतेने वागविले पाहिजे. सर्वांना विद्यादान दिले पाहिजे व सर्वांचा हक्क समान समजला पाहिजे."[४३]

राजर्षी शाहूंच्या वरील विचारांचा सर्वांगाने विचार केला असता असे लक्षात येते की, शाहूंच्या सर्व कार्यापाठीमागील, विचारामागील एकच धडपड होती की, समाजात समानता प्रस्थापित व्हावी. प्रत्येक व्यक्तीची शैक्षणिक, सामाजिक उन्नती होऊन सर्वच समाज समानतेच्या पातळीवर यावा.

शाहूंच्या स्वराज्यविषयक विचारांचे विवेचन केले असता असे लक्षात येते की, शाहूंची स्वराज्याची कल्पना संकुचित नव्हती. त्यांना लोकशाहीचा पाया विस्तृत करावयाचा होता. त्यांना समाजातील लोकांना त्यांच्या हक्क, कर्तव्यांबाबत जागृत करावयाचे होते. हिंदी राष्ट्रवादाचे क्षेत्र त्यांना सर्वसमावेशक बनवायचे होते. मागास व दलित वर्गाला राजकारणात न्यायसिद्ध अधिकार व वाव मिळाला पाहिजे ही शाहूंची मागणी महाराष्ट्रातील ब्राम्हणी राष्ट्रवाद्यांनी जातीय आहे असा गैरसमज पसरविला व शाहू स्वराज्यद्रोही असल्याची टिका करून शाहूंना बदनाम करण्याचा ही प्रयत्न केला.

## शैक्षणिक विचारसरणी :

समाजव्यवस्थेतील शैक्षणिक परिस्थितीच्या विषमतेतून छत्रपती शाहूंची शैक्षणिक विचारसरणी तयार झाली होती. त्यामुळे सर्वप्रथम शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. 'जातिव्यवस्था' हे भारतीय समाज रचनेचे एक अमानवी असे वैशिष्ट्य आहे. जातिव्यवस्थेची कडक बंधने समाजावरती असून ब्राम्हण सोडून इतर सर्वांचे स्थान शुद्रांचे आहे असा दंडक ब्राम्हणी व्यवस्थेने रूजविला होता.[४४] याच ब्राम्हणी

---

४३. कित्ता - पृ.क्र.१०८ - १०९

४४. कराडे जगन्नाथ - आरक्षण धोरण आणि वास्तव,२००५ पृ.क्र.११

व्यवस्थेने स्त्रिया आणि शुद्र यांना शिक्षणाचा अधिकार नाकारला. त्यामुळे बहुसंख्य समाज हा अज्ञानीच राहिला.

पिढ्यान् पिढ्या अज्ञानाच्या गर्तेतून बहुजन समाजाची सुटका झाली नाही. भारतात ब्रिटीशांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी व्यक्तीची जात, धर्म, वंश याबाबत भेदभाव न करता शिक्षण प्रसाराच्या कार्यास सुरूवात केली. भारतीय समाज व्यवस्थेवर वर्षानुवर्षे असलेले रूढी, परंपरा यांचे जोखड बाजूला सारून शिक्षण प्रसाराच्या कार्यास ब्रिटीशांना फारशी भरीव कामगिरी करता आली नाही.

स्त्रिया आणि बहुजन समाजात शिक्षण प्रसाराच्या कार्याची सुरूवात महाराष्ट्रात सर्वप्रथम महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केली. हे शिक्षण प्रसाराचे कार्य करून या विभूतिंनी प्रस्थापित व्यवस्थेलाच सुरूंग लावला.

शिकायचे ते उच्च वर्णियांनीच -धनिकांनी-जमिनदारांनी. गरिब, दलित व स्त्रिया यांनी शिकणे हा गुन्हा आहे असे त्यावेळी मानले जात असे. अंधश्रद्धा व धर्मभोळे पणामुळे खेडयापाडयातून सारा समाज पिचून गेला होता. शिकणे हे आपले काम नव्हे. ते ब्राम्हण-श्रीमंत -सावकार यांचेच कार्य आहे. अशी सामान्य माणसांची समजूत होती.[४५] तशातच शाळेतील मुलांना बाटवून ख्रिश्चन करतात अशी अफवा पसरलेली मग शाळेकडे कोण फिरणार? इंग्रजांनी उघडलेल्या शाळेत ब्राम्हणांचाच भरणा होता.[४६] प्राचीन काळापासून ब्राम्हणांनी धर्माचा धाक दाखवून अशा प्रकारे जनसामान्यांना शिक्षणापासून वंचित केले होते.

करवीर राज्याचा कारभार १८४४ साली ब्रिटीशांनी आपल्या हाती घेतला. मेजर डी. सी. ग्रॅहम यांची राजनैतिक अधीक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली. १८४४ ते १८५३ या दहा वर्षाच्या आपल्या कोल्हापूरच्या वास्तव्यात करवीर

४५. नाईक तु. बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९७४ पृ. क्र. ७४

४६. सुर्यवंशी कृ. गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ. क. ७९

राज्याचा स्टॅटिस्टिकल रिपोर्ट तयार करण्याची संस्मरणीय कामगिरी त्यांनी केली. करवीर राज्याच्या संदर्भात ग्रॅहम रिपोर्ट प्रमाणभूत मानला जातो. या रिपोर्टवरून करवीर राज्यातील शैक्षणिक दु:स्थितीची स्पष्ट कल्पना येते. "on the introductions of British., management the grossest ignorance pervaded all classes. Few of sardars could sign their names and many of Govt. scribes were unable to compose and indite a comman letter."[47]

१८९४ ला छत्रपती शाहू महाराजांनी पदभार स्वीकारल्यानंतर कोल्हापूर संस्थानमधील शिक्षण विषयक परिस्थिती अत्यंत असमाधानकारक व अन्याय परिपोषक असल्याची त्यांच्या दृष्टीस पडली. जनतेच्या विविध विभागांमध्ये शैक्षणिकदृष्ट्या प्रचंड तफावत होती. कारण अल्पसंख्य ब्राम्हण समाज तेवढा शिक्षित होता. संख्येने मोठा असलेला ब्राम्हणेत्तर समाज मात्र बहुतांशी निरक्षरच राहिला होता.

सन १८८१ च्या आकडेवारीनुसार कोल्हापूर संस्थानात साक्षरतेचे प्रमाण विविध समाजात खाललिप्रमाणे होते.

| | |
|---|---|
| ब्राम्हण | ७९.१ टक्के |
| मराठा | ८.६ टक्के |
| कुणबी | १.५ टक्के |
| जैन व लिंगायत | १०.६ टक्के |
| मुसलमान | ७.५ टक्के [४८] |

१८९४ सालच्या एकूण ९ लाख १० हजार लोकसंख्येपैकी ब्राम्हणांची संख्या २६ हजार इतकी होती. या २६ हजार लोकसंख्येपैकी ८० टक्के ब्राम्हण शिकलेले होते आणि राहिलेल्या २० टक्के लोकसंख्येत जैन, लिंगायत, मुसलमान इ. लोक येत होते.

शिक्षणात ज्यांची मक्तेदारी होती. त्या ब्राम्हणांनीच शिक्षणाच्या जोरावर प्रशासनातील बहुतेक पदे बळकावली होती.

४७. कित्ता - पृ.क्र. १६६

४८. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1983, Page No.- 4 (Introduction)

१८९४ च्या कोल्हापूर दरबारच्या ७१ अधिकाऱ्यापैकी ६० ब्राम्हण आणि खाजगीच्या ५२ अधिकाऱ्यापैकी ४६ ब्राम्हण होते.[४९]

'तसेच त्यावेळी कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये शिक्षण घेणाऱ्या एकूण ४४१ विद्यार्थ्यांमध्ये ३६८ ब्राम्हण विद्यार्थी होते. आणि राजाराम कॉलेजमध्ये एकूण ६१ विद्यार्थीच होतं पण त्यापैकी ५५ विद्यार्थी मात्र केवळ ब्राम्हण वर्गाचेच होते.'[५०]

ब्राम्हण व ब्राम्हणेत्तर समाज यामधील अधिकारी व विद्यार्थी यांच्या संख्येतील ही प्रचंड विषमता वस्तुस्थिती निदर्शक होती. कारण ब्राम्हण व इतर समाजातील लोक यामध्ये साक्षरतेच्या प्रमाणात भयानक स्वरूपाची तफावत अस्तित्वात होती.

'१८९४ साली छत्रपती शाहूंच्या हाती जेंव्हा राज्यकारभाराची सुत्रे आली तेंव्हा इचलकरंजी, कागल, विशाळगड, बावडा, कापशी आदी सर्व जहागिरीतील शाळा जमेस धरून करवीर राज्यातील एकूण शाळांची संख्या अवघी २२४ होती. आणि विद्यार्थी संख्या होती १४,८१९ लोकसंख्या ९,१0,000 होती. करवीर राज्याचे उत्पन्न होते रू. ३८,९0,0८५ आणि शिक्षणावर होणारा खर्च होता १,४५,७२0 एकूण लोकसंख्येच्या १.६२ टक्के लोक शिक्षणार्थी होते. हे प्रमाण जसे नगण्य होते. तसेच शिक्षणावरील खर्चा चे प्रमाणही नगण्यच होते. ते शेकडा फक्त ३.७५ होते.'[५१]

---

४९. कित्ता

५0. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २00७, पृ.क्र.५९२

५१. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४पृ.क.१६८

## १८९३-९४ साली करवीर राज्यातील शाळा व विद्यार्थी [५२]

| शाळा संख्या | शाळांचे स्वरूप | पटसंख्या |
|---|---|---|
| | **अ. माध्यमिक शाळा** | |
| १ | राजाराम हायस्कूल सरदारवर्ग यासह | ३९९ |
| | राजाराम कॉलेज | ६१ |
| १ | अमेरिकन मिशनची दरबारच्या मदतीची शाळा | ७५ |
| | **आ. विशेष शाळा** | |
| १ | अध्यापक विद्यालय | १८ |
| १ | अध्यापिका विद्यालय | १० |
| | **इ. ॲग्लो व्हर्नाक्युलर शाळा** | |
| १ | फर्स्ट ग्रेड ए. व्ही. शाळा | ११२ |
| ८ | सेकंड ग्रेड ए. व्ही. शाळा | १३८४ |
| १ | दरबारच्या मदतीचे प्रायव्हट इंग्लिश स्कूल | २३८ |
| | **ई. प्राथमिक शाळा मुलांकरिता** | |
| १४२ | प्राथमिक शाळा | ९७१८ |
| ४ | प्राथमिक रात्रशाळा | ११५ |
| ३७ | खाजगी सरकारमान्य शाळा | १२०९ |
| २६ | प्राथमिक मुलींच्या शाळा | १४१९ |
| | **ड. औद्योगिक शाळा** | |
| १ | जे. जी. टेक्निकल शाळा | ६१ |
| २२४ | एकूण संख्या (प्रशासकीय अहवाल १८९३-९४) | १४८१९ |

---

५२. कित्ता - पृ. क्र. १६९

## छत्रपती शाहूंची शैक्षणिक विचारसरणी :

राजर्षी छत्रपती शाहूंचे शिक्षणविषयक विचार अभ्यासले असता असे लक्षात येते की, संस्थानच्या शैक्षणिक परिस्थितीच्या प्रभावातून त्यांचे विचार तयार झाले होते. कोल्हापूर संस्थानची राज्यसूत्रे हाती घेतल्यानंतर शाहूंना जनतेची सर्वांगीण प्रगती करावयाची होती. यासाठी छत्रपती शाहूंनी प्रशासन, शेती, उद्योगधंदे, शिक्षण, आरोग्य इत्यादी क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या होत्या.

या सर्व कार्यात छत्रपती शाहूंचे शैक्षणिक कार्य व्यापक होते. छत्रपती शाहूंच्या सुधारणांमध्ये शैक्षणिक कार्याशी संबंधित अशा शैक्षणिक सुधारणांना अग्रक्रम दिला जातो. जनतेच्या सर्वांगीण प्रगतीचे साधन शिक्षणच आहे हे सत्य त्यांनी सुरूवातीलाच जाणले होते.

हिंदी लोकांच्या एकदेशी शिक्षणातील दोष महाराजांनी इतरांपेक्षा पुष्कळ अगोदर ओळखिले होते. शिक्षण एकदेशी म्हणण्याचे कारण शिक्षणाची कक्षा त्याकाळी एका लहानशा जाती पलीकडे जात नव्हती.[५३]

प्राचीन काळापासून शिक्षणावर ब्राम्हणांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. त्यामुळे ब्राम्हणेत्तरांना शिक्षणाचा अधिकार नाकारला गेला. यापाठीमागील कारणमीमांसा लोकांना पटवून देताना १९१८ च्या आर्यधर्मपरिषदेच्या ११ व्या अधिवेशानात महाराज म्हणतात, "ब्राम्हणत्व वास्तविक पाहता गुणकर्मावर अवलंबून असावयाचे ते जातीवर येऊन बसले. तीर्थाचे काल्पनिक माहात्म्य वाढविण्यात आले. त्यामुळे तेथील नामधारी ब्राम्हणांस विपुल मिष्टान्न मिळू लागून द्रव्य प्राप्तीही फार होऊ लागल्याने त्यांच्यात आळस व दुर्व्यसने वाढून त्यांना विद्या शिकण्याचे अगत्य वाटेनासे झाले. मनुष्य उपजल्यापासून तो मरेपर्यत त्यांचेकडून निरनिराळे रूपाने पैसा मिळविण्याकरिता व्रते, दाने वगैरे विषयीचे ग्रंथ तयार केले गेले. इतकेच नव्हे तर मेल्यावरही मृतास पोचविण्याकरिता म्हणून श्राद्ध, म्हाळ, दान

५३. लट्ठे आ. बा. - श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र
बा. ल. पाटील कोल्हापूर १९२५पृ. क्र. १२१ - १२२

वगैरे मिळावे याकरिता गरूड पुराणांसारखे गारूडी ग्रंथ तयार झाले. याप्रमाणे अज्ञान्यांच्या पैशावर ब्राम्हण म्हणविणारांची खूप चंगळ उडाल्याने ब्राम्हणांतील विद्या नष्ट होत चालली. आपले व आपल्या संततीचे यथास्थित चालले पाहिजे या बुद्धीने ब्राम्हणेत्तरांची ही विद्या त्यांचे कडून बंद करण्यात आली."[५४]

महाराजांच्या मते, केवळ स्वार्थी बुद्धीने प्रेरित होऊन ब्राम्हणांनी ब्राम्हणेत्तरांना शिक्षणाचा अधिकार नाकारला व स्वत:चा अधिकाधिक फायदा करून घेतला. महाराजांच्या मते, शिक्षणाच्या माध्यमातून ब्राम्हणांनी धार्मिक क्षेत्रावर तर आपली मक्तेदारी निर्माण केलीच पण त्याच बरोबर शिक्षणाच्या जोरावर त्यांनी राजकीय सत्ताही हस्तगत केली. या सत्तेच्या जोरावर ब्राम्हणांनी संस्थानातील सर्व प्रकारच्या सुख सोयी व सरकारी नोकरीत आपले वर्चस्व प्रस्थापित केले

ही गोष्ट जेंव्हा महाराजांच्या निदर्शनास आली तेव्हा ब्राम्हणांच्या हातून ही सत्ता हिसकावून घेण्यासाठी आणि ब्राम्हणेत्तरांना प्रशासकीय व्यवस्थेत व निर्णय निर्धारण प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी पाश्चात्य शिक्षण संपादण्यासाठी ब्राम्हणेत्तरांची मने वळविली पाहिजे याखेरीज दुसरा तरणोपाय नाही अशी महाराजांची समजूत झाली.

शिवाय महाराजांना जे कार्य करावयाचे होते त्या कार्याकडे सहानुभूतिपुर्वक पाहणारा अधिकारी वर्ग महाराजांना प्रथम निर्माण करावयाचा होता. महाराजांचे धोरण अक्षरश: अंमलात आणणारा असा खात्रीचा अधिकारी वर्ग असल्याखेरीज महाराजांचे सर्व प्रयत्न यशस्वी झाले नसते व त्यांचे विचार कृतीत केंव्हाही उतरले नसते.[५५] यासाठी महाराजांना बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे आवश्यक वाटत होते.

राजर्षीच्या शैक्षणिक चळवळीचे मुख्य सुत्र शिक्षण मक्तेदारीकडून सार्वजनिकतेकडे जावे असे होते. सर्व समाजाला समानतेच्या पातळीवर आणून त्यांचे हित

५४. जाधव भ. बा. - राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ. क्र. २९ ३०

५५. लट्ठे आ. बा. - श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र, बा. ल. पाटील, कोल्हापूर, १९२५पृ. क्र. १२२

साधावे हा त्यापाठीमागे प्रमुख विचार होता.[५६]

शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना खामगाव येथील डिसेबंर १९१७ च्या आपल्या भाषणात महाराज म्हणतात, "शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो अज्ञानांत बुडून गेलेल्या देशांत उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत."[५७]

जोपर्यंत सर्वसाधारण जनता सुशिक्षित होत नाही, तोपर्यंत राज्याची प्रगती होणार नाही अशी शाहूंची पक्की खात्री होती.

महाराजांच्या मते हल्लीच्या जीवन कलहाच्या काळात जो समाज शिक्षण संपन्न आहे तोच टिकाव धरू शकेल. म्हणजेच शाहूंनी आगामी काळाची पावले आधीच ओळखली होती असे म्हणता येईल. कारण आधुनिक काळातील स्पर्धेच्या युगात शिक्षित समाजच आपला टिकाव धरून राहू शकतो.

जो पर्यंत भारतातील प्रत्येक स्त्री- पुरूष शिक्षित होत नाही. तोपर्यंत भारत स्वतंत्र, समृद्ध, एकजीव आणि बलवान होऊ शकत नाही. याविषयी महाराजांना पूर्ण विश्वास होता.[५८]

शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीचा विकास होतो. व्यक्तीचा विकास म्हणजे पर्यायाने राष्ट्राचा विकास अशी शाहूंची मनोधारणा होती. शिक्षणामुळे व्यक्तीच्या विचारांच्या कक्षा रूदांवतात. व्यक्ती जात, धर्म, पंथ यांच्या पलिकडे जाऊन विचार करू शकते. त्यामुळे समाजात एकतेची बंधुभावाची भावना निर्माण होऊन राष्ट्र एकात्म व पर्यायाने सर्व शक्ती एकवटल्याने बलवान होईल असे शाहूंना वाटत होते.

---

५६. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.क्र.६०५

५७. जाधव भ.बा. - राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ.क्र.२

५८. भगत रा.तु. - शिक्षण महर्षी शाहू महाराज, सिद्धराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९९ पृ.क्र.४७

खालील मुद्दयांच्या आधारेही शाहूंचे शिक्षण विषयक विचार ठळकपणे स्पष्ट होतात...

### १. स्वराज्यासाठी शिक्षण :

सर्वांना समदृष्टीने पाहणाऱ्या ब्रिटीशांच्या हातून सत्ता काढून घेऊन ती मूठभर पांढरपेशा ब्राम्हण समाजाच्या हाती देणे महाराजांना पसंद नव्हते. स्वराज्याचे हक्क बहाल करण्यापूर्वी स्वराज्याचे हक्क उपभोगण्याची पात्रता बहुजन समाजाच्या ठिकाणी उत्पन्न झाली पाहिजे असे महाराजांचे मत होते. यासाठी महाराजांना शिक्षण महत्त्वाचे वाटत होते.

शिक्षणाच्या माध्यमातून समाजात असणारे जातीभेद नष्ट करून सर्व समाज एका समान पातळीवर महाराजांना आणावयाचा होता. एक समान व एकसंघ अशा समाजाच्या हाती महाराजांना राज्यकारभार सोपावयाचा होता, स्वराज्याचे अधिकार बहाल करावयाचे होते. यावरून असे म्हणता येईल की, शिक्षण ही स्वराज्याचे हक्क बहाल करण्यासाठी शाहूंची पूर्व अट होती.

### २. जातिभेदाच्या समूळ उच्चाटनासाठी :

सामाजिक विषमता आणि जातिभेद यांना मूठमाती देऊन समता, बंधुत्व आणि स्वातंत्र्य या त्रिसुत्रीवर शाहूंनी समाजाची निर्मिती करायची होती. समाजातील सर्व प्रकारचे भेदभाव नष्ट करण्याचा प्रभावी मार्ग म्हणून महात्मा फुले यांनी शिक्षणाचा पुरस्कार केला. महात्मा फुले यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन छत्रपती शाहूंनी शिक्षण प्रसाराचे व अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले.

तत्कालीन समाजात गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य असे भेदभाव बोकाळलेले होते. समाजाची एकूणच स्थिती चिंताजनक असल्याचे शाहू महाराजांना जाणवले. हे सर्व प्रकारचे भेदभाव समूळ नष्ट करण्यासाठी गोरगरिब व दलित यांच्या शिक्षणाची सोय करणे शाहूंना गरजेचे वाटत होते. [५९]

---

५९ पवार जयसिंगराव पवार - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.क्र.६०७

शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास करता येईल अशी शाहूंची खात्री होती.

शिक्षणाच्या माध्यमातूनच व्यक्ती-व्यक्तीमध्ये असणारे भेदभाव नष्ट होतील अशी शाहूंची खात्री होती. शिक्षणाचा प्रसार झाल्याखेरीज प्रगतीच्या प्रवाहात सर्व समाज सामवला जाणार नाही. सर्व समाजात वैचारिक, सांस्कृतिक, आर्थिक अभिसरणशीलता निर्माण होणार नाही व त्याशिवाय समाज एकजिन्सी होणार नाही याची महाराजांना खात्री होती.[६०]

शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला सुशिक्षित करून त्याला शोषणमुक्त करता येईल अशी खात्री असल्याने सप्टेंबर १९०२ मध्ये राजारामियन क्लबने दिलेल्या मानपत्राला उत्तरादाखला केलेल्या आपल्या भाषणात महाराज म्हणतात, "शिक्षणाचे महत्त्व समजून विस्तृत प्रमाणावर शिक्षणाचा प्रसार झाल्याखेरीज अशाप्रकारचे भेदभाव नष्ट होणार नाहीत आणि हाच हेतू साध्य करण्यासाठी माझा सतत प्रयत्न आहे. निरनिराळया जातींच्या शैक्षणिक प्रगतीत जोपर्यंत अशा प्रकारचे महदतंर आहे. तोपर्यंत पुष्कळ दिवसांचे भेदभाव नष्ट करण्याचे सर्व औपचारिक प्रयत्न निष्फळच होणार."[६१]

### ३. समाजाच्या प्रत्येक घटकाच्या उन्नतीसाठी शिक्षण :

समाजातील प्रत्येक घटकास शिक्षणाची गरज आहे हे स्पष्ट करताना महाराज म्हणतात, समाजातील प्रत्येक घटकास शिक्षणाची गरज आहे. शिक्षणाची गरज नाही असे आज कोणतेही क्षेत्र नाही. मग तो शेतकरी असो अथवा सैनिक असो.

खामगाव येथील १९१७ च्या ११ व्या अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात महाराज म्हणतात, "हल्लीच्या काळी शेतकी इतकी काही

६०. भोसले एस.एस. - चंदनार्थे राजर्षी शाहू, जन्मशताब्दी स्मरणिका, १९७४-७५, जिल्हापरिषदर, कोल्हापूर, १९७५ पृ. क्र. ३१

६१. जाधव भ.बा. - राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ.क्र.१८६

पद्धतशीर झाली आहे की ज्याला यांत यश मिळवायचे आहे त्याला त्या विषयावरील पुस्तके वाचता आली पाहिजेत व समजली पाहिजेत. अर्वाचीन युद्धपद्धतीत शिक्षणाची अत्यंत जरूरी आहे. प्रत्येक सैनिकास संग्राम शास्त्रावरील पुस्तकें वाचतां आली पाहिजेत........... जर मराठे लोकांना शिक्षण मिळेल तर ते खात्रीने अधिक चांगले योद्धे होतील. हल्लीच्या लढाईच्या दिवसात तोफखान्यावरील लोक उत्तम गणिती असले पाहिजेत. म्हणून हीच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगावी लागते आणि सर्व स्थितीचा विचार करिता एकच तत्त्व निघते, ते हे की, प्रत्येक मराठा चांगला सुशिक्षित झाला पाहिजे.[६२]

शाहूंच्या मते, आधुनिक काळात शिक्षणाचे क्षेत्र सर्वसमावेशक बनले आहे. समाजातील कोणताही घटक शिक्षणापासून अलिप्त राहू शकत नाही. मग तो स्त्री असो की पुरूष, शेतकरी असो की सैनिक असो. विविध स्तरावरील शिक्षणाबाबत असणारे शाहूंचे विचार खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**प्राथमिक शिक्षणाविषयीचे विचार :**

राजर्षींना प्राथमिक शिक्षणातून एकसंघ समाज निर्माण करावयाच होता.[६३] जनता सुशिक्षित झाली तरच सामाजिक आणि आर्थिक विकास होईल असे त्यांना वाटत होते. त्यादृष्टीने ८ सप्टेंबर १९१७ ला राजर्षींनी सर्व मुलांच्या सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला.

बहुजन समाज जरी प्राथमिक शिक्षणाने विभूषित झाला तरी त्यांचे हाती आपल्या संस्थानचा कारभार देण्याची शाहूंची तयारी होती. म्हणूनच थोडया लोकांना उच्च शिक्षण देण्यापेक्षा सर्व लोकांना किमान प्राथमिक शिक्षण तरी मिळाले पाहिजे अशा त्यांचा आग्रह होता. म्हणूनच श्री उदाजी मराठा विद्यार्थी वसतीगृहाच्या इमारतीच्या कोनशीला समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून केलेल्या भाषणात महाराज म्हणतात, "माझी

६२. कित्ता - पृ.क्र.८
६३. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.क्र.६०४

सर्व प्रजा मराठी तिसरी इयत्ता तरी शिकून तयार झाली असती तर त्यांना राज्यकारभााराचे हक्क आनंदाने देऊन मी आजच विश्रांती घेतली असती....रयतेतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश मिळाला पाहिजे. असे माझे मत आहे."[६४] मूठभर लोकांना उच्च शिक्षण देण्यासाठी उच्च शिक्षणावर खर्च करण्यापेक्षा तो प्राथमिक शिक्षणावर करावा असे शाहूंचे मत होते. दरबारला राजाराम कॉलेजचा खर्च जेव्हा झेपेना तेव्हा महाराजांनी हे बंद करावे असा हुकुम केला होता."[६५]

## उच्च शिक्षणाविषयीचे विचार :

शाहू छत्रपतींनी बहुजन समाजातील मुलांच्या उच्च शिक्षणाला देखील प्रोत्साहन दिले होते. उच्च शिक्षणासाठी त्यांनी काही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या देऊन परदेशातही पाठविले होते. जेणेकरून तेथे जाऊन त्यांनी उच्च शिक्षण घ्यावे आणि देशाच्या विकासासाठी सिद्ध व्हावे. त्यांच्या या योजनेनुसार अनेक विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन उच्चविद्या विभूषित होण्याचे भाग्य लाभले.[६६] यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रावब. पी. सी. पाटील, प्री. सी. आर तावडे, भाई माधवराव बागल यांच्या नावाचा समावेश होतो.

## स्त्री शिक्षणविषयक विचार :

स्त्री पुरूष दोघांनाही समाजामध्ये समान स्थान असले पाहिजे या विचारांचे शाहू महाराज होते. म्हणून तर त्यांनी स्त्री शिक्षणावरही आपले लक्ष केंद्रित केले. त्याकाळात ब्राम्हणांचे कट्टर नेते लोकमान्य टिळक यांनीदेखील प्राथमिक शिक्षण आणि स्त्री शिक्षणाला विरोध दर्शविला होता. याउलट छत्रपती शाहूंचे मत असे होते की, स्त्री

६४. जाधव भ. बा. - राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन,कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ. क्र. ७४ - ७५

६५. भगत रा. तु. - शिक्षण महर्षी शाहू महाराज, सिद्धराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९९ पृ. क्र. ५९- ६०

६६. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००७, पृ. क्र. ६०९

शिक्षित झाली तर कुटुंबाच्या स्वावलंबनामध्ये आणि मुलाबाळांच्या संगोपनामध्ये हातभार लावल्याशिवाय राहणार नाही.[६७]

**व्यावसायिक शिक्षण :**

छत्रपती शाहूंनी व्यावसायिक शिक्षणाचा ही पाया आपल्या संस्थानात घातला. इ.स.१९०३ मध्ये त्यांनी कोल्हापूरात 'ओब्रायन टेक्किनकल स्कूल' ची स्थापना केली. तेथे वेगवेगळया उद्योगांसाठी त्यांनी शिक्षणाची व्यवस्था केली. व्यावसायिक शिक्षण सर्वांना मिळाले तरच समाजाची आर्थिक प्रगती होईल असे त्यांचे मत होते.[६८]

**धार्मिक शिक्षणासंबंधीचे विचार :**

ब्राम्हणांच्या धार्मिक क्षेत्रातील मक्तेदारीला आळा घालण्यासाठी आणि ब्राम्हण पुरोहितांकडून ब्राम्हणेत्तरांची होणारी फसवणूक थांबण्यासाठी महाराजांनी धार्मिक शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन केल्या. त्यामध्ये सत्यशोधक पाठशाळा व श्री शिवाजी वैदिक विद्यालय यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

विविध धार्मिक संस्कार धर्मशास्त्राप्रमाणे कसे केले पाहिजेत याचे शिक्षण या शैक्षणिक संस्थातून दिले आहे. तसेच समाजात पसरलेल्या वाईट चालीरीतींची मानसिक गुलामगिरी तोडण्याचे महत्त्वाचे काम या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केले.

शिक्षणाची भाषा, शिक्षक व विद्यार्थी कसा असावा याविषयी आपले विचार प्रकट करताना महाराज म्हणतात, जनसमुदायात जर शिक्षणाचा खराखूरा प्रसार करावयाचा असेल तर मातृभाषेसारखे बलवत्तर साधन नाही.[६९] शिक्षकांविषयी आपले विचार प्रकट करताना महाराज म्हणतात, "शिक्षक चारिञ्य संपन्न व श्रद्धावान असला पाहिजे. स्वत:च्या विषयाचे पूर्ण ज्ञान त्याला कळकळीने देता आले पाहिजे. त्याचा शब्द विद्यार्थ्यांच्या अंत:करणापर्यंत जाऊन भिडला पाहिजे."[७०] आणि म्हणूनच तोफखाने

---

६७. कित्ता - पृ.क्र.६०८
६८. कित्ता
६९. भगत रा.तु.- शिक्षण महर्षी शाहू महाराज, सिद्धराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९९ पृ.क्र.११३
७०. कित्ता - पृ.क्र.१०९

गुरूजीबरोबर बोलताना महाराज म्हणाले होते की, "अहो तोफखाने, तुम्ही मांडणी मांडता ती सर्व ठीक आहे पण तुम्ही म्हणता तसे हृद्यस्थ आत्म्याला जागे करणारे शिक्षण देणारे शिक्षक मिळालेच नाहीत तर आज मुले बिघडतात तशा मुलीही बिघडण्याची शक्यता आहे."[७१]

राजर्षीना त्याकाळामध्ये शिक्षण प्रसाराची जी चोखंदळ दृष्टी होती, त्यामधून त्यांना सज्ञानी, चारित्र्यसंपन्न, स्वदेशप्रेमी व समाजसेवी असा विद्यार्थी निर्माण करावयाचा होता असे लक्षात येते.[७२]

शिक्षण हे सामाजिक विकासाचे, ऐहिक समृद्धीचे आणि सत्तेचे उगमस्थान असल्याने शाहूंना हे शिक्षण हरएक मार्गाने समाजातील सर्व थरांतील लोकांपर्यत पोहचवावयाचे होते.[७३]

स्थानिक राज्यकारभारात आणि सार्वजनिक संस्थात मागासवर्गीयांनी मोठया प्रमाणात प्रतिनिधीत्व द्यायचे असे छत्रपतींना वाट होते. त्यामुळेच मागासवर्गीयांनी आपल्या अधिकाराविषयी जागृत व्हावे आणि त्यासाठी आपण त्या वर्गामध्ये शिक्षण प्रसार केला तर ही गोष्ट आपणास साधेल असा शाहूंचा विश्वास होता.[७४] त्यामुळेच त्यांनी दुर्बल, निरक्षर मागासवर्गीय व दलित या बहुजनांमध्ये शिक्षण प्रसार करण्याचे ठरविले.

वरीलप्रमाणे शाहूंच्या शैक्षणिक विचारांचा परामर्श घेतला असता असे लक्षात येते की,जनतेच्या सर्वांगीण प्रगतीचा शिक्षण हा पाया आहे हे सत्य शाहूंनी सुरूवातीपासूनच जाणले होते.तसेच अपेक्षित सामाजिक परिवर्तन घडवून आणून ते चिरस्थायी टिकविण्याचे प्रभावी साधन म्हणजे शिक्षण हे तत्त्व व त्याचे सामर्थ्य छत्रपती

---

| | | |
|---|---|---|
| ७१. तोफखाने वा.द. | - | राजर्षी शाहू छत्रपती यांचे अंतरंग, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९६३ पृ.क्र.८३ |
| ७२. भगत रा.तु. | - | शिक्षण महर्षी शाहू महाराज, सिद्धराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९९ पृ.क्र.११० |
| ७३. कित्ता | - | पृ.क्र.११६ |
| ७४. कीर धनंजय | - | राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतीकारक राजा,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई,२००१, पृ.क्र.१०५ |

शाहू महाराजांनी विद्यार्थी दशेपासूनच पटले होते. त्यामुळे त्यांनी शिक्षणकार्यास प्राधान्य दिले. शिवाय कोल्हापूर संस्थानातील आपल्या प्रजेला काही राजकीय अधिकार देऊन त्यांना प्रशासकीय यंत्रणेत सहभागी करून घ्यावे आणि शक्य तितक्या लवकर राजकीय स्वयंशासनाच्या पद्धतीचा प्रारंभ करावा अशी छत्रपती शाहू महाराजांची तीव्र इच्छा होती आणि ही मनिषा फलद्रुप होण्यासाठी प्रजा सुशिक्षित असणे अगदी आवश्यक आहे. ही गोष्ट त्यांच्या ध्यानी आली होती.

साहजिकच सर्वांगीण प्रगतीचा पाया, सामाजिक परिवर्तनाचे माध्यम आणि प्रशासकीय सुधारणांपूर्वीची आवश्यक बाब म्हणून शिक्षणाला समाजात अत्यंत महत्त्वाचे स्थान, अशा प्रमुख सुत्रांची खूणगाठ छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या मनाशी पक्की बांधली असल्याने त्यांनी शिक्षण क्षेत्रात अमूलाग्र सुधारणा घडवून आणण्यास अग्रक्रम दिला आणि राजसूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांची अंमलबजावणी करण्यास निष्ठेने व विधीपूर्वक प्रारंभ केला.[७५]

---

७५. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.क्र.५९१-५९२

## संदर्भ


१. कीर धनंजय - प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती, श्री शाहू व्याख्यामाला, पुष्प पहिले, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, मार्च १९७0 पृ.क्र १३

२. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २00७, पृ.क्र.५८४

३. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) - Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1983, Page No.- 3-4. (Introduction)

४. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.६८

५. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) - Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1983 Page No.- 4 (Introduction)

६. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.६७

७. कित्ता -

८. कीर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती-एक समाजक्रांतीकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२00१, पृ.क्र.४३

९. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.६८- ६९

१0. कित्ता - पृ.क्र.७७

११. नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.१५

१२. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.६९

१३. नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.१४

१४. कित्ता - पृ.क्र.१३ - १४

१५. साळुंखे पी.बी - राजर्षी शाहू गौरव, ग्रंथ महाराष्ट्र राज्य शिक्षण सचिवालय, मुंबई, १९७६ पृ.क्र.२0३

१६. जाधव भ.बा. - राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ.क्र.३
१७. कित्ता - पृ.क्र.१५- १६
१८. कित्ता - पृ.क्र.४१
१९. कित्ता - पृ.क्र.३१
२०. कित्ता - पृ.क्र.३९
२१. कित्ता - पृ.क्र.९०
२२. कित्ता - पृ.क्र.९० - ९१
२३. कित्ता - पृ.क्र.७९
२४. कित्ता - पृ.क्र.१२५
२५. कित्ता - पृ.क्र.९७
२६. कित्ता - पृ.क्र.८
२७. कित्ता - पृ.क्र.१०६
२८. कित्ता - पृ.क्र.१९२
२९. कित्ता - पृ.क्र.१०१
३०. नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.१४
३१. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.क्र.१८२
३२. जाधव भ.बा. - राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ.क्र.३ - ४
३३. कित्ता - पृ.क्र.६७
३४. कित्ता - पृ.क्र.६- ७
३५. कित्ता - पृ.क्र.७२
३६. कित्ता - पृ.क्र.१८ (पुरस्कार)
३७. कित्ता - पृ.क्र. ७४ - ७५
३८. कित्ता - पृ.क्र.७५
३९. कित्ता
४०. कित्ता - पृ.क्र.७६
४१. कित्ता - पृ.क्र.७
४२. कित्ता - पृ.क्र.७१
४३. कित्ता - पृ.क्र.१०८ १०९



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

४४. कराडे जगन्नाथ - आरक्षण धोरण आणि वास्तव,२००५ पृ.क्र.११

४५.नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.७४

४६.सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.७९

४७. कित्ता - पृ.क्र. १६६

४८. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1983, Page No.- 4 (Introduction)

४९. कित्ता

५०. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.क्र.५९२

५१. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४पृ.क.१६८

५२.कित्ता - पृ.क्र. १६९

५३.लठ्ठे अ.बा. - श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र बा.ल.पाटील कोल्हापूर १९२५पृ.क्र १२१-१२२

५४.जाधव भ.बा. - राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर,पहिली आवृत्ती,१९७१,पृ.क्र.२९-३०

५५. लठ्ठे अ.बा. - श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र बा.ल.पाटील कोल्हापूर १९२५पृ.क्र.१२२

५६. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.क्र.६०५

५७. जाधव भ.बा. - राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ.क्र.२

५८. भगत रा.तु. - शिक्षण महर्षी शाहू महाराज, सिद्धराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९९ पृ.क्र.४७

५९. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.क्र.६०७

६०. भोसले एस.एस. - चंदनार्थे राजर्षी शाहू , जन्मशताब्दी स्मरणिका, १९७४-७५, जिल्हापरिषदर, कोल्हापूर, १९७५ पृ. क्र .३१
६१. जाधव भ.बा. - राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ.क्र.१८६
६२. कित्ता - पृ.क्र.८
६३. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.क्र.६०४
६४. जाधव भ.बा. - राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर,पहिली आवृत्ती, १९७१, पृ.क्र.७४ - ७५
६५. भगत रा.तु. - शिक्षण महर्षी शाहू महाराज, सिद्धराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९९ पृ.क्र.५९-६०
६६. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.क्र.६०९
६७. कित्ता - पृ.क्र.६०८
६८. कित्ता
६९. भगत रा.तु. - शिक्षण महर्षी शाहू महाराज, सिद्धराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९९ पृ.क्र.११३
७०. कित्ता - पृ.क्र.१०९
७१. तोफखाने वा.द. - राजर्षी शाहू छत्रपती यांचे अंतरंग, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९६३ पृ.क्र.८३
७२. भगत रा.तु. - शिक्षण महर्षी शाहू महाराज, सिद्धराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९९ पृ.क्र.११०
७३. कित्ता - पृ.क्र.११६
७४. कीर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतीकारक राजा,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई,२००१, पृ.क्र.१०५
७५. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.क्र.५९१-५९२